**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १७ डिसेंबर २०२४**

**ठळक बातम्या**

- **एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं आज लोकसभेत सादर.**
- **विधिमंडळात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु; बीड आणि परभणी प्रकरणावरून विरोधकांचा गदारोळ.**
- **2047 पर्यंत भारताला आर्थिक महासत्ता बनवण्यात भारतीय महसूल सेवेतील अधिकारी वर्ग महत्त्वाची भूमिका पार पाडणार- राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचं प्रतिपादन.**
- **विदर्भात थंडीचा कडाका कायम परंतु आगामी काही दिवसात तापमानात ३ ते ५ अंशापर्यंत वाढ होण्याची शक्यता.**

एक देश एक निवडणूक

एक देश एक निवडणूक संदर्भातली दोन विधेयकं आज लोकसभेत मांडण्यात आली. केंद्रीय कायदा मंत्री अर्जुन राम मेघवाल विधेयक मांडत असताना विरोधकांनी विधेयक मांडण्यावर मतदानाची मागणी केली. त्यावर २६९ सदस्यांनी विधेयक मांडण्याच्या बाजूने कौल दिला. तर १९८ सदस्यांनी विधेयक मांडण्याला विरोध केला. त्यात काँग्रेस, समाजवादी पार्टी, द्रमुक, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, सीपीआय एम आणि इतर विरोधी खासदारांचा समावेश होता. ही विधेयकं म्हणजे संविधानाच्या मूलभूत ढाच्यावर हल्ला असल्याचं सांगत त्यांचा मसुदा आधी संयुक्त संसदीय समितीकडे तपासण्यासाठी पाठवावा अशी मागणी विरोधी पक्ष सदस्यांनी केली. विरोधकांचे आरोप खोडून काढताना अर्जुन राम मेघवाल यांनी देशाचे पहिले कायदेमंत्री डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विधानाचा दाखला दिला.संविधानाचं संघराज्य स्वरुप कोणीही बदलू शकत नाही असं ते म्हणाले.

संविधान चर्चा /राज्यसभा

भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त राज्यसभेतल्या चर्चेला आज पुन्हा सुरुवात झाली. सभागृहाचे नेते आणि केंद्रीय मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी आपल्या भाषणात सांगितलं की भारत केवळ जगातली सर्वात मोठी लोकशाही आहे असं नव्हे

तर लोकशाहीची जन्मभूमी देखील आहे. भारतीय संस्कृती आणि परिसंस्थेत स्वातंत्र्य, समता आणि समावेशन तसंच नागरिकांना सन्मानान जगण्याची संधी ही लोकशाही तत्वं मुळापासून रुजली आहेत असं ते म्हणाले.

विधानसभा-विरोधक/तालिका/अभिभाषण चर्चा

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्या दिवशी सुद्धा कामकाज सुरू होण्याआधी विरोधकांनी परभणी आणि बीड इथल्या घटनांच्या निषेधार्थ विधानभवनाच्या पायऱ्यांवर सरकारच्या विरोधात घोषणाबाजी केली. विधानसभेत बीड जिल्हयातल्या मस्साजोगच्या संरपंचाचं हत्या प्रकरण आणि परभणी इथल्या हिंसाचाराचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. यासंदर्भातला स्थगन प्रस्ताव काँग्रेसच्या नितीन राऊत यांनी मांडला त्याला नाना पटोले यांनी अनुमोदन दिलं. हा विषय गंभीर असून, त्यावर उद्या नियम १०१ अन्वये चर्चा घेण्याचं अध्यक्षांनी जाहीर केलं. मात्र सदनात स्थगन प्रस्ताव आणून या विषयावर आजच चर्चा करण्याची विरोधकांची मागणी फेटाळल्यामुळे विरोधकांनी सभात्याग केला. स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून विरोधक या प्रश्नांवर चर्चा मागत होते पण हा प्रस्ताव फेटाळून विरोधकांचा आवाज दाबला गेला अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. याच विषयी विधानसभे बाहेर आपली प्रतिक्रिया देताना विरोधी पक्षाचे अंबादास दानवे म्हणाले....

***सरपंचाचा निर्घृण खून आणि त्याचप्रमाणे परभणी मध्ये संविधान रक्षण करणारा सूर्यवंशी नामक कार्यकर्ता याचा कारागृहात झालेला मृत्यू. कारागृहात जो मृत्यू झाला चा रिपोर्ट आलेला आहे आणि त्या रिपोर्ट शवविच्छेदनामध्ये पोस्टमार्ट मध्ये डॉक्टरने स्पष्टपणे म्हटलेलं आहे. या सूर्यवंशीचा खून, मृत्यू हा खऱ्या अर्थाने मारहानीमुळे झालेला आहे आणि बीड मध्ये जो खून झालेला आहे, सरपंच संतोष देशमुख यांचा यांच्यामध्ये सत्ताधारी पक्षाचे लोक सहभागी आहेत सरकार या दोन्ही ठिकाणी कारवाही करत नाही आणि यांच्याविषयी आज महविकास आघाडीने आंदोलनाची भूमिका घेतली आहे.***

तत्पूर्वी, विधानसभेत तालिका सदस्य म्हणून विजय रहांगडाले, रमेश बोरनारे, शेखर निकम आणि दिलीप सोपल यांची नियुक्ती केल्याचं अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी जाहीर केलं. नुकत्याच मुंबईत झालेल्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात राज्यपाल

सी.पी.राधाकृष्णन यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव भाजपचे पराग अळवणी यांनी मांडला. ते म्हणाले कि ....

***नवीन सरकार या ठिकाणी स्थापन झालेलं आहे आणि एक माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणमध्ये सर सर्व मुद्दे आपण पाहिले आणि कशा पद्धतीने राज्यसरकारने महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी ज्या विविध योजना, विविध निर्णय घेतला आहे त्याचा उहापोह या अभिभाषणमध्ये झाला आहे आणि एका आकाराने नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये महाराष्ट्राच्या जनतेने सुद्धा या सर्व मुद्यांवर पाठिंबा दर्शवत हे प्रचंड मताधिक्य महायुती सरकारला दिले आहे.***

मराठी भाषेच्या संवर्धनासाठी केंद्र सरकार निधी देणार असून राज्य सरकारही निधी देईल. राज्याला प्रगतीच्या मार्गावर नेण्यासाठी राज्य सरकार आणखी मजबुतीने काम करेल असा विश्वास भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी सदनात व्यक्त केला. राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत ते बोलत होते. महायुती सरकारने गेल्या अडीच वर्षात उल्लेखनीय कार्य केलं आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी हरित डेटा सेंटर तयार करणारे महाराष्ट्र देशात प्रथम राज्य असल्याचं आमदार मनीषा कायंदे म्हणाल्या.

विधान परिषद-अंबादास दानवे

विधान परिषदेच्या सभापती पदाची निवडणूक येत्या १९ डिसेंबरला होणार आहे. उपसभापती निलम गोर्हे यांनी आज ही घोषणा केली. उद्या १८ डिसेंबर रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असल्याचं त्यांनी सांगितलं. विधान परिषदेत आज राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरू आहे. या चर्चेदरम्यान बोलताना विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी महायुती सरकारच्या काळात राज्यात असलेली प्राथमिक आरोग्य केंद्रांची कमतरता आणि औषध साठ्यांचा अभाव यावर सभागृहाचं लक्ष वेधलं. जलजीवन मिशन योजनेतील गैरव्यवहार आणि निकृष्ट दर्जाचे साहित्य यावर त्यांनी टीका केली. महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न, नदीजोड प्रकल्प, महिला सक्षमीकरणासाठीच्या योजना याबाबत विद्यमान सरकारच्या नीतींवर त्यांनी टीका केली. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर असून याबाबत सरकारने काहीही केलं नाही असं मत त्यांनी सभागृहात व्यक्त केल.

उद्धव ठाकरे

आज उद्धव ठाकरे ह्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ह्यांची भेट घेऊन, त्यांचं अभिनंदन केलं. ह्यावेळी युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे, विधानपरिषद विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आमदार अनिल परब, आदी नेते उपस्थित होते.

एनएडीटी

2047 या वर्षामध्ये भारताला जगाची आर्थिक महासत्ता बनविण्यात भारतीय करप्रणाली आणि ही प्रणाली राबविणारा भारतीय महसूल सेवेतील अधिकारी वर्ग हे महत्त्वाची भूमिका पार पाडणार असून जगाच्या नकाशावर भारत आपली आर्थिक सांस्कृतिक आणि सामाजिक मूल्य जोपासून आर्थिक विकासात सदैव अग्रेसर राहील असं प्रतिपादन राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या 78व्या तुकडीच्या उद्घाटन समारंभात नागपूर इथं व्यक्त केलं. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या 18 व्या तुकडी मध्ये 60 टक्के महिला अधिकारी असणे ही खरंच एक अभिमानाची बाब असल्याचे सुद्धा ते म्हणाले. उद्घाटन समारंभा प्रसंगी राज्यपालांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं आणि राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमी नागपुरतर्फे स्मृतीचिन्ह म्हणून बस्तर धोकरा या छत्तीसगडमधील भौगोलिक निर्देशांक प्राप्त कलाकृतीची भेट त्यांना देण्यात आली. राष्ट्रीय प्रत्यक्ष कर अकादमीच्या 78 व्या तुकडीमध्ये एकूण 145 अधिकारी असून दोन अधिकारी हे भूतान रॉयल सर्विसचे आहेत. 78वी बॅच ही 16 महिन्याचे प्रशिक्षण देणार असून बॅचची सरासरी आयुर्मर्यादा 27 वर्षांची आहे. बॅचमध्ये महिला अधिकाऱ्यांची संख्या 60 असून ती संपूर्ण बॅचच्या 41 टक्के एवढी आहे.

उद्धव ठाकरे

राज्याच्या हिवाळी अधिवेशनासाठी दुसऱ्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी नागपूरला हजेरी लावली. यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेऊन विविध मुद्द्यांवरून सरकारवर हल्लाबोल केला. देशभरातून ईव्हीएमला विरोध होत आहे. महाराष्ट्रातही भाजपने ईव्हीएमच्या माध्यमातून निवडणुका जिंकल्या आहेत. बॅलेट पेपरद्वारे निवडणुका घेऊन दाखवावे, असे आव्हान उद्धव ठाकरेंनी दिले. वन नेशन, वन इलेक्शन आणि ईव्हीएम बद्दल बोलताना ते म्हणाले की

***<u>अगर राष्ट्रपतिजी का चुनाव होता है, तो चुनाव आयुक्त का चुनाव क्यो नही होता है, तो वह भी चुनाव होना चाहिए, ऐसी मेरी मर्जी जो भी कोई है उसको मै वहा बिठा दूंगा ऐसे नहीं चलेगि ऐसी बात, तो उनका भी चुनाव होना ही चाहिये । और फिर बाद मे वन नेशन वन इलेक्शन जब तक जो लोगों के मन मे आशंका है EVM के बारे मे दूर करो होणे दो एक बार बलेट पेपर पर वोटिंग होने दो । अगर यही बहुमत उनको मिलता है तो कोई किसी को कुछ कहने की आवश्यकता नहीं ।</u>***

अदानी प्रकरण असो की देशाचे इतर महत्त्वाचे प्रश्न, त्यांच्याकडून लक्ष हटवण्यासाठी 'वन नेशन, वन इलेक्शन'चा मुद्दा उपस्थित केला जात आहे, अशी टीका त्यांनी केली.

लोकसभा/शिवराज सिंग

शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकारने सहा कलमी कार्यक्रम तयार केला असल्याची माहिती, केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज लोकसभेत एका प्रश्नाच्या उत्तरात दिली. यात उत्पादकतेत वाढ, उत्पादन खर्चात कपात, पिकांना हमीभाव, नैसर्गिक संकटग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, लागवडीत विविधता आणि सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन या मुद्द्यांचा समावेश आहे.

छगन भुजबळ

आपल्याला मंत्रिपदाचा प्रश्न नसून, आपली अवहेलना करण्यात आल्याचं, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. भुजबळ यांना मंत्रिपद मिळालं नसल्याबद्दल त्यांच्या नाराज कार्यकर्त्यांच्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

हवामान

विदर्भात थंडीचा कडाका कायम आहे. परंतु आगामी काही दिवसात तापमानात ३ ते ५ अंशापर्यंत वाढ होण्याची शक्यता हवामान खात्यानं वर्तविली आहे. दरम्यान, आज नागपूर आणि गोंदिया जिल्ह्यात विदर्भातील सर्वात कमी किमान तापमान आठ पूर्णांक दोन अंश सेल्सिअस इतकं नोंदवण्यात आलं. त्या पाठोपाठ गडचिरोली जिल्ह्यात आठ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली. वर्धा इथं नऊ पूर्णांक पाच इतक तापमान होतं, तर भंडारा

इथं  दहा अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. याशिवाय पश्चिम विदर्भातील अमरावती इथं  11 पूर्णांक 4, अकोला येथे १० पूर्णांक ५,  बुलढाणा इथं  ११पूर्णांक ६ तर वाशीम मध्ये  १३ पूर्णांक ६  अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.  येत्या 20 तारखेपर्यंत हवामान कोरडे राहणार असल्याचा अंदाज नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्याने वर्तवला असून वीस तारखेला गडचिरोली जिल्हयात तुरळ ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

******